**<u>ठळक बातम्या</u>**

- अंदाज समित्यांनी दिलेल्या शिफारसींमुळे प्रशासनाला योग्य दिशा मिळत असल्याचं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांचं प्रतिपादन

- एनपीएस किंवा युपीएस मधून एक निवृत्ती वेतन योजना निवडण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

- इराणमध्ये सत्तांतराची माजी युवराज रेझा पहलवी यांची मागणी, रशियाची मदत मागण्यासाठी इराणचे परराष्ट्रमंत्री मॉस्कोमध्ये

- सीरियामध्ये चर्चमध्ये झालेल्या आत्मघातकी बॉम्बस्फोटात २२ जणांचा मृत्यू, ६३ जण जखमी

**आणि**

- इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात, भारताच्या दुसऱ्या डावात के.एल. राहुल आणि ऋषभ पंत यांची शतकं

**<><><><>**

सरकारची धोरणं, योजना आणि कृतींवर अंदाज समित्यांनी दिलेल्या शिफारसींमुळे प्रशासनाला योग्य दिशा मिळत असल्याचं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी केलं. राष्ट्रीय अंदाज समितीच्या कार्यारंभाला ७५ वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त मुंबईत विधान भवनात आयोजित दोन दिवसीय परिषदेच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. अंदाज समित्या निधी वाटप आणि अर्थसंकल्पीय खर्चाचं पारदर्शकतेनं निरीक्षण करतात, असंही बिरला यावेळी म्हणाले.

- **होल्ड - बिर्ला -**

लोकशाहीत सरकारवर नियंत्रण ठेवणाऱ्या संसदेचं काम हे अंदाज समित्यांमुळे अधिक प्रभावी होत असतं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले. अंदाज समित्या अर्थसंकल्पातल्या तरतुदींवर देखरेख ठेवतानाच, विभागांना अधिक कार्यक्षम बनवण्यासाठी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन आत्मसात करण्यात मदत करतात, असंही ते म्हणाले.

**- होल्ड - फडणवीस -**

या प्रसंगी राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज प्रधानमंत्री संग्रहालय आणि लायब्ररी सोसायटीच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारणसभेचं अध्यक्षपद भूषवलं. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, निर्मला सितारामन, अश्विनी वैष्णव, गजेंद्र सिंग शेखावत आणि धर्मेंद्र प्रधान या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><>**

पाच विधानसभा मतदार संघामधल्या पोटनिवडणुकीचे आज निकाल जाहीर झाले. त्यात आम आदमी पार्टीचे दोन, तर भाजपा, काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांनी प्रत्येकी एक जागा जिंकली आहे. गुजरातमधल्या दोन जागांपैकी काडी मतदार संघातून भाजपाचे राजेंद्र कुमार चावडा, तर विसवदार मतदार संघातून आम आदमी पार्टीचे इतालिया गोपाल यांनी विजय मिळवला. पंजाबमध्ये लुधियाना पश्चिम मतदार संघात आम आदमी पार्टीचे, संजीव अरोरा, पश्चिम बंगालमधल्या कालिगंज मतदार संघात तृणमूल काँग्रेसच्या अलिफा अहमद, तर केरळच्या निलंबुर मतदार संघातून काँग्रेसचे आर्यादान शौकत यांनी विजय मिळवला.

**<><><><>**

केंद्र सरकारनं अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना युपीएस अर्थात एकीकृत निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय निवडण्यासाठी आणखी ३ महिन्यांचा अवधी दिला आहे. एनपीएस किंवा युपीएस पैकी कोणती निवृत्ती वेतन योजना निवडायची हे आता ३० सप्टेंबर पर्यंत कळवता येईल.

**<><><><>**

गेल्या ११ वर्षात तंत्रज्ञान हे भारताच्या विकासगाथेचं इंजिन झालं आहे, असं विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. गेल्या अकरा वर्षात देशाने केलेल्या वैज्ञानिक प्रगतीचा आढावा त्यांनी नवी दिल्लीत आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत घेतला. २०१४ मधे देशात फक्त ५० जैव तंत्रज्ञान स्टार्टअप होती आता १० हजाराहून अधिक स्टार्टअप सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. शाश्वत विकासासाठी जैवविविधता प्रमुख साधनसंपत्ती उपलब्ध होऊ शकते असे ते म्हणाले. नव्या भारताला

आकार देण्यात विज्ञान, नवोन्मेष आणि प्रशासन क्षेत्रातल्या सुधारणांचा सिंहाचा वाटा असल्याचं त्यांनी सांगितलं. जगातल्या दहाव्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेपासून भारताची प्रगती चौथ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेपर्यंत झाल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षांत देशातल्या अल्पसंख्याक समुदायाच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या परिस्थितीत सुधारणांसाठी केंद्र सरकारनं केलेल्या उपाययोजनांचा आढावा आता जाणून घेऊया

**- होल्ड - व्हाइस कास्ट -**

*गेल्या दशकात सरकारनं शिक्षण, आर्थिक सक्षमीकरण आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रात विविध उपक्रमांद्वारे अल्पसंख्याक समुदायाच्या प्रगतीसाठी अनेक पावलं उचलली आहेत. प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमानं सुमारे १८ हजार ४०० कोटी रुपयांहून अधिक किमतीचे प्रकल्प मंजूर केले आहेत. राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास आणि वित्त महामंडळानं मागासवर्गीयांना सवलतीच्या दरात कर्ज दिली आहेत. त्यानुसार मंडळानं १ लाख ७४ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना ७५२ कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित केली आहे. हज सुविधा ॲप आणि हज स्वयंसेवकांसाठी समर्पित प्रशिक्षण कार्यक्रमांनी तीर्थयात्रा करणाऱ्या भाविकांची यात्रा सुकर होत आहे. ऐतिहासिक वक्फ सुधारणा कायदा, २०२५ आणि उमीद पोर्टलमुळे पारदर्शकता वाढली असून वक्फ मालमत्तांसाठी डिजिटल व्यवस्थापनाचं एक नवीन युग सुरू झालं आहे.*

*तसंच बौद्ध विकास योजना, जिओ पारसी आणि इतर योजनांद्वारे संस्कृतीचे जतन, शिक्षणाला प्रोत्साहन आणि समुदाय कल्याण यामुळे विविध समुदायांच्या गरजा पूर्ण होत आहेत. समर्पित योजना, शिष्यवृत्ती समर्थन, डिजिटल सुधारणा आणि वारसा संवर्धनाद्वारे, सरकार सक्षमीकरण आणि शाश्वत समावेशनाला प्रोत्साहन देत आहे.*

**<><><><>**

त्रिपुरा हे देशातलं तिसरं पूर्ण साक्षर राज्य बनलं आहे. आगरताळा इथं झालेल्या एका कार्यक्रमात त्रिपुराचे मुख्यमंत्री डॉ. माणिक साहा यांनी हे जाहीर केलं. त्रिपुराच्या इतिहासात हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. कोणत्याही वयात शिक्षण घेता येते त्यासाठी ठरावीक वय वा वेळेची गरज नसते असं ते म्हणाले.

**<><><><>**

इराणचे माजी युवराज रेझा पहलवी यांनी सत्तांतराची मागणी केली आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी आणि इतर इराणमधून पळून जाण्याच्या प्रयत्नात असल्याचा दावा त्यांनी केला. खोमेनी सत्तेत आल्यापासून पहलवी दुसऱ्या देशात आश्रयाला आहेत. सत्ता सोडली तर कायदेशीर मार्गाने, निष्पक्षरित्या तुमच्याविरोधात

खटला चालवला जाईल. या संकटाच्या काळात देशात स्थैर्य, स्वातंत्र्य आणि न्याय देण्यासाठी मी तयार आहे. शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि लोकशाही मार्गानं सत्तांतर करण्याची इच्छा असल्याचं पहलवी म्हणाले.

दरम्यान, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची आज रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यासाठी मॉस्कोला पोहोचले. इराणवर झालेला हल्ला अनावश्यक आहे असं पुतीन यावेळी म्हणाले.

**<><><><>**

सीरियामध्ये एका चर्चमध्ये झालेल्या आत्मघातकी बॉम्बस्फोटात किमान २२ जणांचा मृत्यू झाला. तर ६३ जण जखमी झाले आहेत. दमास्कसमध्ये रविवारी संध्याकाळी दोन हल्लेखोरांनी सेंट एलियास ऑर्थोडॉक्स चर्चमध्ये घुसून गोळीबार केला. तसंच या हल्लेखोरांनी प्रवेशद्वाराजवळ स्फोट घडवून स्वतःला संपवल्याचं वृत्त आहे. बळींमध्ये महिला आणि मुलांचा समावेश आहे.

**<><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या तेंडुलकर-अँडरसन कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात, आज चौथ्या दिवशी भारताच्या दुसऱ्या डावात के.एल. राहुल आणि ऋषभ पंत यांनी शतकं झळकावली.ऋषभ पंत ११८ धावांवर बाद झाला. मात्र केएल राहुल शतक झळकवल्यानंतरही अजून खेळतो आहे. भारतानं कालच्या दोन बाद ९० धावांवरुन आज पुढचा खेळ सुरू केल्यानंतर कर्णधार शुभमन गील ८ धावांवर बाद झाला. मात्र त्यानंतर राहुल आणि पंत यांनी दमदार फलंदाजी करत धावसंख्या वाढवली. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ४ बाद २९७ धावा झाल्या होत्या आणि भारताकडे ३०३ धावांची आघाडी होती.

**//<><><><>//**